# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
# कोकण परिमंडळ कार्यालय
# ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी

ग्राहक तक्रार क्र. ८८/२०११ दि.३०.०५.२०११

| | |
|---|---|
| श्री.ऋषिकेश राजाराम मडव.<br>५५४, भगवती निवास,<br>मु.गिम्हवणे, ता.दापोली,<br>जि.रत्नागिरी. | तक्रारदार ग्राहक |

विरुध्द

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता 'महावितरण'<br>स व सु विभाग खेड . | विरुध्द पक्षकार |
| फोरम उपस्थिती | १) श्री. डी. एस्. जामखेडकर, अध्यक्ष<br>२)श्री.व्हि.बी.जगताप, कार्यकारी अभियंता<br>३) श्री.एन्.ए.कुलकर्णी , सदस्य |
| ग्राहकाच्या वतीने | अनुपस्थित |
| विरुध्द पक्षकाराच्या वतीने | श्री.एस.व्हि.तावाडे ( कार्यकारी अभियंता)<br>विभागीय कार्यालय खेड<br>श्री.सत्यनारायण कोंडा (सहाय्यक अभियंता)<br>उपविभाग दापोली |

*महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :*

*श्री. ऋषिकेश राजाराम मडव, राहणार ५५४, भगवती निवास, मु.गिम्हवणे, ता.दापोली यांनी आपला तक्रार अर्ज विहीत नमुन्यात दि.३०.०५.२०११ रोजी आवश्यक त्या तपशिलासह सादर केलेली असून, त्यांनी घेतलेल्या तात्पुरत्या वीजजोडणी साठी भरलेली अनामत रक्कम सदर कनेक्शन बंद केल्यानंतर एक वर्षभराचा कालावधी होत आला ,पण अद्याप अनामत रक्कम परत मिळाली नसल्याचे आपल्या तक्रारीत नमुद केले आहे.*

*तक्रार प्राप्त होताच नियमावलीच्या आधारे कार्यपध्दतीची पुर्तता केल्यानंतर उभयपक्षाना नोटीस काढून दि.०५.०७.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली.*

*सुनावणी दरम्यान तक्रारदार ग्राहक व्यक्तीशः अथवा त्याचे कोणतेही प्रतिनिधी सुनावणीसाठी हजर राहीले नाहीत. तथापी तक्रारदाराच्या वतीने त्याचे वडील श्री.राजाराम मडव यांनी दि.३०.०६.२०११ रोजी या मंचास पत्र पाठवून कळविले आहे की तक्रार अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे अनामत रक्कम त्यांना परत मिळालेली असून आता या प्रकरणामंध्ये त्यांची कोणतीही तक्रार नाही.*

*महावितरणच्यावतीने खेड विभागीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता श्री.एस.व्हि.तावाडे यांनी सुनावणीत भाग घेऊन आपला युक्तीवाद मांडताना स्पष्ट केले की, तक्रारदाराच्या अर्जानुसार योग्य ती अनामत रक्कम दि.३१.०५.२०११ रोजी चेकद्वारे अदा केलेली असून प्रस्तुत प्रकरणामंध्ये रक्कम अदा करणेस झालेला विलंब हा फंड उपलब्ध न झाल्यामुळे झालेला आहे. ग्राहकाच्या अर्जानुसार फंडसाठी मागणी दि.३०.०१.२०११ रोजीच केलेली असून दि.२३.०५.२०११ रोजी फंड प्राप्त झाले व बँके मंध्ये तो जमा करुन दि.३१.०५.२०११ रोजी सबंधीतास अदा केलेला आहे. फंड प्राप्त होण्याच्या दृष्टीने विभागीय कार्यालयाने योग्य ती कार्यवाही वेळीच पुर्ण केलेली असल्यामुळे झालेला विलंब क्षमापित करण्यात यावा.*

*सदरहू तक्रार प्रकरणामंध्ये दाखल करण्यात आलेली कागदपत्रे व महावितरणच्या वतीने केलेला युक्तीवाद याचा अभ्यास करता ग्राहकाची तक्रार मान्य करण्यात आलेली आहे. तक्रारदाराच्या अर्जानुसार महावितरणकडून योग्य ती अनामत रक्कम फंड प्राप्त होताच अदा केलेली असून ग्राहकानी देखिल या बाबतीत पत्रव्यवहार करुन मंचास कळविलेले आहे. तसेच या संबधात ग्राहकानी यापुढे आपली काहीही तक्रार नसल्याचे कळविले आहे. महावितरणच्या विभागीय कार्यालयाने देखिल फंड प्राप्त होण्याकरीता योग्य ती दखल घेऊन वेळीच पत्रव्यवहार केलेला आहे. पण प्रत्यक्ष फंड उपलब्धी होणे ही बाब त्यांच्या आवाक्याबाहेरची असल्यामुळे, त्यांनी अनामत रक्कम अदा करण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यासाठी केलेली विनंती, वस्तुस्थिती लक्षात घेता योग्य आहे असे मंचास वाटते.*

*तक्रार प्रकरणातील वस्तुस्थिती व मंचाने नोंदविलेला निष्कर्ष यानुसार खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.*

# *आदेश*

1. *अर्जदाराची तक्रार मान्य करण्यात येत आहे.*

२. खर्च तसेच अनुषंगिक बाबीबद्दल कोणताही आदेश नाही.

३. या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :-

सचिव,
लोकपाल महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग
६०६/६०८, केशवा बिल्डींग,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५१.
फोन नं. ०२२ / २६५९२९६५

| | | |
|---|---|---|
| डी. एस्. जामखेडकर | व्हि.बी.जगताप | एन्.ए.कुलकर्णी |
| अध्यक्ष | कार्यकारी अभियंता व सचिव | सदस्य |
| ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल | ग्रातनिमं, कोकण परिमंडल |

दिनांक :- १३.०७.२०११
ठिकाण :- रत्नागिरी.